NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020
YEAR : 45) 15th July 2020 ( No. of Pages 12 ) ( No : 06

# तात्पुरत्या सेवेच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेचे लाभ द्यावे लागतील

## *मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे प्रशासकीय न्यायाधिकरणाचा निर्णय*

**- डॉ. प्रवीण रघुवंशी,** *अध्यक्ष 'नुटा'*

**१.** कारण नसतांना म्हणजे विनाकारण कंत्राटी तत्वावर (Contract Appointment) अधिव्याख्यात्याची करण्यात आलेली नेमणूक तदर्थ नेमणूक (Ad-hoc Appointment) समजून व सेवेत असलेला खंड क्षमापीत करून नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून त्यांची सेवा धरून त्याला आश्वासित प्रगती योजनेचे सर्व लाभ देण्यात यावे व त्याला जुनी पेन्शन योजनाच लागू राहील, अशा प्रकारचा निर्णय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने एका प्रकरणात दिनांक ६ मार्च २०२० रोजी दिलेला आहे. **नेट-सेट मुक्त शिक्षकांचे हे प्रकरण नाही, हे याबाबतीत लक्षात ठेवले पाहिजे. मात्र नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या प्रकरणामध्ये लागू पडतील असे काही धोरणात्मक निर्णय या निकालामध्ये आढळून येतात.** हा एका अधिव्याख्यात्याच्या बाबतीत झालेला निर्णय असला तरी इतर अनेकांना लागू केलेला न्याय या एकाच अधिव्याख्यात्याला नाकारण्यात आल्याचे न्यायाधिकरणाच्या सुनावणीत निष्पन्न झालेले आहे. म्हणायला हा न्यायाधिकरणाचा निर्णय असला तरी तो मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयांनी निश्चित केलेल्या धोरणाच्या आधारे देण्यात आलेला असल्यामुळे त्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासारखे आहे.

**२.** सन २०१८ च्या मूळ अर्ज (Original Application) क्रमांक ४३ मध्ये महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या मुंबई पीठाचे न्यायमूर्ती श्री.ए.पी.कुऱ्हेकर यांच्या खंडपीठाने दिनांक ६ मार्च २०२० रोजी दिलेला हा निर्णय आहे. या निर्णयामधील अर्जदार डॉ.श्री.बी.डी.भोसले यांची सन २००२ मध्ये सहाय्यक अधिव्याख्याता म्हणून कंत्राटी पद्धतीने शासकीय महाविद्यालयात नेमणूक झालेली होती. त्यांच्या सेवेत काही तांत्रिक खंड सुद्धा होते. पुढे त्यांची लोकसेवा आयोगाकडून सहाय्यक अधिव्याख्याता म्हणून निवड झाली व रितसर कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयामध्ये सहाय्यक अधिव्याख्याता म्हणून ११ सप्टेंबर २००७ रोजी नेमणूक झाली. त्यांची २००७ मध्ये नेमणूक झालेली असल्यामुळे त्यांना नवीन पेन्शन योजना लागू होईल अशी भूमिका शासनाने घेतली होती. इतकेच नव्हे तर आश्वासित प्रगती योजनेसाठी कंत्राटी पद्धतीची २००२ ते २००७ या कालखंडातील सेवा धरली जाणार नाही, असेही शासनाचे म्हणणे होते.

**३.** अर्जदाराच्या वतीने न्यायाधिकरणासमोर अशी बाजू मांडण्यात आली की, कंत्राटी पद्धतीने सेवेत नेमणुका झालेल्या अनेक अधिव्याख्यात्यांना त्यांच्या कंत्राटी पद्धतीच्या सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्यात आलेले आहेत. इतरांची लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेली नव्हती. श्री.भोसले यांची लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेली आहे व त्यांची नेमणूक ही २००७ मध्ये झालेली आहे, असा मुद्दा शासनातर्फे न्यायाधिकरणासमोर मांडण्यात आला. ("since the Applicant is appointed on regular basis through MPSC, by order dated 10.09.2007, he is not entitled to the benefit of earlier period.")

**४.** शासनाने यापूर्वी पाच अधिव्याख्यात्यांच्या कंत्राटी पद्धतीच्या सेवा आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनार्थ नियमित करणारा शासननिर्णय दिनांक १४ मे २०१२ रोजी काढलेला होता. त्या शासननिर्णयाच्या प्रस्तावनेत पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले होते. :-

*"उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय महाविद्यालये/संस्था यातील नियमित स्वरूपाची अध्यापकांची रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे भरली जाईपर्यंत विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून जाहीरात देऊन तात्पुरत्या कालावधीसाठी हंगामी पद्धतीने भरण्याची पद्धत दि. २५.०७.२००२ पूर्वी अस्तित्वात होती. या पद्धतीस अनुसरून दि. ०१.०६.२००२ रोजी उच्च शिक्षण संचालनालयातर्फे देण्यात आलेल्या हंगामी/तात्पुरत्या स्वरूपातील अधिव्याख्याता पदाच्या भरतीसाठी दिलेल्या जाहिरातीस इतर उमेदवारांबरोबर प्रतिसाद देऊन डॉ. विशाखा सुभाष सावजी, डॉ. ममता दत्तात्रय उपगडे, श्रीमती छाया चंद्रकांत पाटील, श्रीमती अनिता मोतीरामजी मालगे व श्री. भिमराव महादेव पाटील या ५ उमेदवारांनी अर्ज केले. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने ज्या अधिव्याख्यात्यांच्या नियुक्त्या केल्या गेल्या त्या अधिव्याख्यात्यांना हंगामी संबोधुन नियमित वेतनश्रेणी देण्यात आली. तसेच न्यायालयीन आदेशास अनुसरून त्यांना दि. २९.०८.२००१ च्या शासननिर्णयान्वये वार्षिक वेतनवाढीही सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने देण्यात आल्या आहेत. तथापि, प्रस्तुत ५ उमेदवारांची, नियुक्ती प्रक्रिया हंगामी नियुक्त्यांप्रमाणे केल्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात भरावयाची अधिव्याख्यात्यांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याचा दि. २५.०७.२००२ चा शासननिर्णय अस्तित्वात आल्याने त्यांना हंगामी स्वरूपात नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती न देता रू. ८०००/- एवढ्या ठोक वेतनावर कंत्राटी स्वरुपात नियुक्ती देण्यात आली. सदर त्रुटी दुर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती."* उपरोक्त शासननिर्णयाप्रमाणे त्या सर्व शिक्षकांच्या सेवा नियमित करण्यात आल्या होत्या.

**५.** ज्या ५ शिक्षकांचा उल्लेख वर करण्यात आला आहे त्या पाच शिक्षकांना न्याय सुखासुखी मिळालेला नाही. त्यांनासुद्धा जबरदस्त न्यायालयीन संघर्ष करावा लागला होता. १४ मे २०१२ च्या शासननिर्णयाने त्यांच्या सेवा नियमित करण्याच्या अर्धवटपणाविरुद्ध **त्यांना ३ सप्टेंबर २०१५ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर सन २०१५ च्या याचिका क्रमांक ५२६ मध्ये लागलेल्या निर्णयामुळे न्याय मिळाला.** या निर्णयाच्या पहिल्याच परिच्छेदात या याचिकाकर्त्यांचे काय म्हणणे होते? हे नमूद आहे. ते पुढील शब्दात :- "By this petition, the petitioners seek a direction to the respondents to regularize the services of the petitioners and give the effect of permanency from the date of their initial appointment along with consequential benefits." तत्सम प्रकरणी मा. मुंबई न्यायालयाच्या खंडपीठाने यापूर्वीच निर्णय दिला असून तोच न्याय या प्रकरणीसुद्धा लागू होतो असे ठाम निरिक्षण मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणी (W.P. No. 526 of 2015) नोंदविले. ते पुढील शब्दात:- "On hearing the learned Counsel for the parties and on a perusal of the petition, it appears that the case of the petitioners herein stands squarely covered by the judgment dated 19.10.2013 in Writ Petition No.2046/2010 and the petitioners would also be entitled to the regularization of their services." व शेवटी मा. खंडपीठाने पुढीलप्रमाणे निर्णय दिला :- "The respondents are directed to regularize the services of the petitioners and confer permanency. The respondents are directed to absorb the petitioners in service within a period of six weeks, on parity with the petitioners in Writ Petition No.2046/2010. Since the petitioners are in continuous employment, the petitioners should be continued in service as the regular employees."

**६.** मार्च २०२० मधील आताचा हा निर्णय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेला असला तरी तो निर्णय देतांना मा. न्यायाधिकरणाने उच्च न्यायालयाचे धोरणात्मक निर्णय त्या निर्णयामध्ये तपशीलाने उधृत केलेले आहेत. इतकेच नव्हे तर मा. सर्वोच्च न्यायालयाने उत्तरप्रदेश आणि इतर विरुद्ध अरविंद कुमार श्रीवास्तव (2015) 1 SCC 347) या प्रकरणात दिलेला निर्णय १५ व्या परिच्छेदामध्ये तपशीलवार उधृत केलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या

या निर्णयातील महत्त्वाचा एक धोरणात्मक निर्णय परिच्छेद १५ मध्ये नमूद आहे. तो पुढीलप्रमाणे :-"Normal rule is that when a particular set of employees is given relief by the Court, all other identically situated persons need to be treated alike by extending that benefit. Not doing so would amount to discrimination and would be violative of Article 14 of the Constitution of India."

**७.** आम्ही म्हणू त्यांना फायदा देऊ व आम्ही म्हणू त्यांना फायदा देणार नाही असे "आवड-निवड धोरण" शासनाला स्वीकारता येणार नाही असे स्पष्टपणे न्यायाधिकरणाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद १५ मध्ये पुढील शब्दात नमूद केलेले आहे :- "The Government cannot adopt pick and choose approach and being model employer is bound to confer same benefits on other similarly situated employees,"

**८.** शेवटी न्यायाधिकरणाने २००२ ते २००७ या कालखंडातील कंत्राटी पद्धतीवर झालेली नेमणूक ही तदर्थ (Ad-hoc) समजण्यात यावी व आश्वासित प्रगती योजनेचे लाभ ती सेवा धरून देण्यात यावे असा निर्णय दिला. तो पुढील शब्दातः- "(B) It is hereby declared that the period of employment of the Applicant from 24.08.2002 to 10.09.2007 be treated as adhoc employee for consideration of the benefit of Time Bound Promotion."

**९.** नियमित नेमणूक जरी २००७ मध्ये झालेली असली तरी कंत्राटी पद्धतीची पहिली नेमणूक ही २४ ऑगस्ट २००२ रोजी झालेली आहे. हे लक्षात घेता अर्जदाराला जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असेही आदेश मा. न्यायाधिकरणाने दिले. ते पुढील शब्दात :- "(D) The Applicant is held entitled for old pension scheme i.e. M.C.S. (Pension) Rules, 1982."

**१०.** उपरोक्त प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक ९०५१ या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयातील महत्त्वाचा भाग सुद्धा आपल्या निर्णयाच्या परिच्छेद १६ मध्ये उधृत केलेला आहे. तो पुढील शब्दातः- "we do not feel that this is a fit case to interfere with the impugned orders, particularly as interference might result in discrimination between a uniform class of employees, in the matter of extension of benefits under TBPS and/or ACPS. The record indicates that such benefit has been extended by the State Government to hundreds of its employees by taking into consideration service from the date of initial appointment."

सन २०१३ च्या याचिका क्रमांक ९०५१ मध्ये दिलेला ५० परिच्छेदांचा हा निर्णय सन २०१६ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १२१ ते १३५ वर प्रसृत करण्यात आलेला आहे. या निर्णयातील निष्कर्षाची नेट-सेट प्रकरणातील निष्कर्षाशी तुलना करणारा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने संमत केलेला एक तपशीलवार ठराव सन २०१६ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १८० ते १८३ वर प्रसृत केलेला आहे.

**११.** मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २८ एप्रिल २०१६ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ९०५१ मध्ये दिलेल्या निर्णयातील कायदेशीर मुद्यांची मजबुती लक्षात घेता या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयात अपीलात जायचे नाही असा निर्णय राज्यशासनाने घेतला. याचे कारण मा.उच्च न्यायालयाचा हा निर्णय यापूर्वी मा.उच्च न्यायालयाने तत्सम प्रकरणी (W.P. No. 9962 of 2010) दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ रोजी दिलेल्या निर्णयाच्या आधारे देण्यात आला होता.

**१२.** कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित केल्या असे म्हणायचे पण त्यांनी केलेली सेवा आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी मात्र धरायची नाही. अनेक कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये या विरुद्ध दाद मागितली व निर्णय त्यांच्या बाजूने लागले. शासनाने या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या विषयावर मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक ९९६२ मध्ये कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिला. हा निर्णय सन २०१६ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १५० वर शब्दशः प्रसृत करण्यात आलेला आहे.

**१३.** दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक ९९६२ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने जो उपरोक्त निर्णय दिला त्याच्या विरोधात शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल केली होती. ती विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ सप्टेंबर २०१२ रोजी पुढील शब्दात फेटाळून लावली होती. :- "In the facts and circumstances of these cases, we are not inclined to interfere with the impugned orders. The special leave petitions are dismissed." मा. सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश यापूर्वीच बुलेटीनमध्ये प्रसृत करण्यात आलेला आहे. *(P47NB2020)*

*****

# मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अजय देशमुख यांचे दुःखद निधन

मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांचे गुरूवार दि. २ जुलै २०२० रोजी रात्री ८-३० च्या सुमारास असाध्य अशा स्वादुपिंडाच्या कर्करोगाने दुःखद निधन झाले. आपल्या महाविद्यालयीन सेवेपासून ते नुटाचे सक्रिय सदस्य होते. त्यांचा आजीव सदस्य क्रमांक ३४०७ असून नुटा संघटनेच्या विविध आंदोलनांमध्ये आणि विद्यापीठीय निवडणुकांमध्ये त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. संघटना व संघटनेच्या शीर्षस्थ नेतृत्वावर त्यांची निस्सीम श्रद्धा होती. अदम्य महत्त्वाकांक्षा आणि त्यासाठी योजनाबद्ध नियोजन हा त्यांच्या जीवनप्रवासातील एक महत्त्वाचा गुणधर्म राहिलेला आहे. इंग्रजी विषयाचे व्यासंगी प्राध्यापक असणारे डॉ. अजय देशमुख यांनी नांदगाव खंडेश्वर येथील प्रा. राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालयातून आपल्या सेवेची सुरूवात केली. १९९९-२००० पासून त्यांनी कारंजा लाड येथील श्री.किसनलाल नथमल गोयनका कला, वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची जबाबदारी यशस्वीरीत्या सांभाळली. २०१२ ला ते परतवाडा येथील स्व. छगनलाल मूलजीभाई कढी कला महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी रुजू झाले. पुढे त्यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक आणि त्यानंतर कुलसचिव म्हणून कार्य केले. या कालावधीत त्यांनी विद्यापीठ प्रशासनामध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाची अमीट अशी छाप उमटविली. त्यांच्याच कार्यकाळात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला नॅकचे 'अ' दर्जाचे मानांकन प्राप्त झाले. मागील वर्षी त्यांची मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. तेथेही त्यांनी आपल्या कार्यकुशलतेने आपला नावलौकिक निर्माण केला होता.

मुंबई विद्यापीठाने त्याच दिवशी एक प्रसिद्धीपत्रक काढून ही दुःखद बातमी प्रसृत केली. त्या प्रसिद्धी पत्रकातील मजकूर पुढीलप्रमाणे :- "**मुंबई विद्यापीठ : प्रसिद्धी पत्रक :** दिनांक :- २ जुलै, २०२० : मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अजय देशमुख यांचे निधन : **मुंबई, दि. २ जुलै** - मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अजय देशमुख यांचे आज विद्यानगरी येथील राहत्या घरी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५४ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते स्वादूपिंडाच्या कर्करोगाशी झुंज देत होते. प्रकृती अत्यावस्थामुळे सुरुवातीला त्यांची नानावटी रुग्णालयात तपासणी करण्यात आली होती. तपासाअंती त्यांना स्वादूपिंडाचा कर्करोग असल्याचे निदान होताच त्यांना टाटा मेमोरिअल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र अंतिम टप्प्यातील कर्करोगामुळे गुरूवार सायंकाळी राहत्या घरी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुलगा आणि मुलगी आहे. शुक्रवार सकाळी १०.३० वाजता सांताक्रूझ येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. डॉ. अजय देशमुख यांनी २४ जानेवारी, २०१९ रोजी मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिव पदाचा पदभार स्विकारला होता. तत्पूर्वी ते संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे कुलसचिव पदावर कार्यरत होते. त्यापूर्वी ते संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ या पदावर कार्यरत होते. डॉ.अजय देशमुख यांनी त्यांचे पदव्युत्तर शिक्षण एम.ए. इंग्रजी या विषयात केले असून इंग्रजी साहित्यात त्यांनी विपूल संशोधन केले. इंग्रजी साहित्यातील संशोधक म्हणून त्यांनी अनेकांना पीएचडीसाठी मार्गदर्शन केले.

प्रशासनकुशल, कार्यतत्पर व संभाषण कौशल्याने सर्वांना आपलेसे करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ते कायम स्मरणात राहतील. त्यांच्या जाण्यामुळे कोणत्याही पदावर कार्यरत असतांना संघटनेच्या कामाविषयी आदरभाव व आपुलकी मनामध्ये जपणारा नुटा संघटनेचा एक सक्रिय पाठिराखा सदस्य आपल्यातून निघून गेला आहे. - **डॉ. प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष, 'नुटा'**

# IN THE MAHARASHTRA ADMINISTRATIVE TRIBUNAL MUMBAI

## ORIGINAL APPLICATION NO.43 OF 2018

DISTRICT : KOLHAPUR

Dr. Babasaheb D. Bhosale. Assistant Professor (Chemistry), Rajaram College, Kolhapur and residing at 101, Hira Apartment, Rajaram Puri, Ambai Defence, Kolhapur – 416 008....Applicant **VERSUS (1)** The State of Maharashtra. Through Principal Secretary, Higher Education & Technical Dept., Mantralaya, Mumbai – 400 032. **(2)** Director of Higher Education. Having office at Central Building, Pune. **(3)** Principal. Rajaram College, Kolhapur 416 004....Respondents Mr. M.D. Lonkar, Advocate for Applicant. Ms. N.G. Gohad, Presenting Officer for Respondents.

## CORAM : SHRI A.P. KURHEKAR, MEMBER-J

## DATE : 06.03.2020

## JUDGMENT

**1.** The Applicant is seeking declaration that the services rendered by him **during contractual appointment** from 24.08.2002 to 10.09.2007 be treated as **ad-hoc appointment** for consideration of grant of benefit of Assured Career Progression Scheme **(ACPS)** and entitlement of pension under the provisions of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 (hereinafter referred to as 'Rules of 1982' for brevity) invoking jurisdiction of this Tribunal under Section 19 of the Administrative Tribunals Act, 1985.

**2.** Uncontroverted facts giving rise to this application are as under:-

(i) The Applicant is M.Sc. with SET and Ph.D. In pursuance of Advertisement dated 01.06.2002 (Page No.105 of Paper Book), he applied for the post of Assistant Professor and was **appointed on contract basis** by order dated 22nd August, 2002 on consolidated salary of Rs.8000/-.

(ii) The Applicant accordingly joined as Assistant Professor at Rajaram College, Kolhapur on 24.08.2002. Thereafter, he was **continued in service on contractual basis with technical break** of Summer Vacation till 30.04.2007 in view of fresh orders of appointment issued from time to time.

(iii) The Applicant later got selected by communication **through MPSC** by order dated 10.09.2007 in regular pay scale of Rs.8000-275-13500 and was continued at Rajaram College, Kolhapur. He accordingly **joined regular** services w.e.f.11.09.2007. Since then, he is in regular service.

(iv) The Government by order dated 14.05.2012 **regularized the services of similarly situated Assistant Professors** viz. Dr. Vishakha Saoji, Dr. Mamta Upgade, Smt. Chhaya C. Patil, Smt. Anita M. Malge and Shri Bhimrao M. Patil in regular pay scale of Rs.15600-39400.

(v) The Government vide G.R. dated 23.03.2016 regularized the services of above named Assistant Professors **w.e.f. initial date of appointment which was in 2002** and were held entitled for regular pension scheme existing in 2002.

(vi) The Applicant made representation to extend the same benefit to him for regularizing his service from initial date of appointment with consequential service benefits, **but the same was not responded by the Government.**

**3.** Though the Applicant has claimed various reliefs in O.A, during the course of submission, Shri M.D. Lonkar, learned Advocate for the Applicant restricted his claim to the following prayers as mentioned in Clause Nos.15(c), (d) and (e), which are as follows :-

**"(c)** This Hon'ble Tribunal be pleased to hold and declare that the services rendered by the Petitioner **during contractual employment** i.e. from 24.08.2002 to 10.09.2007 deserves to be treated **as ad-hoc employment** and the same is also to be considered for grant of benefit **under Career Advancement Scheme with consequential benefits.**

**(d)** This Hon'ble Tribunal further be pleased to hold and declare that the Petitioner is entitled to claim **condonation of breaks in service i.e. Sumer Vacation,** which were of technical nature and beyond the control of the present Petitioner during the contractual employment i.e. from 24.08.2002 to 10.09.2007.

**(e)** This Hon'ble Tribunal further be pleased to hold and declare that the **old pension scheme** is applicable to the Petitioner in consonance with the provisions of Maharashtra Civil Services (Pension) Rules of 1982 as has been made applicable to those who were initially appointed like the present Petitioner on contractual basis and subsequently treated as adhoc and then regularly absorbed."

**4.** The Respondents resisted the claim by filing Affidavit-in-reply interalia denying the entitlement of the Applicant to the relief claimed. **The Respondents contend that the Applicant was appointed purely on contract basis on consolidated salary** for the period from 24.08.2002 to 10.09.2007 with break in service, and therefore, he is not entitled to the relief claimed. He was appointed on regular basis through MPSC by order dated 10.09.2007, and therefore, the question of considering past service which was of purely contract basis cannot be considered for service benefits claimed in O.A. In respect of regularization of services of Smt. Chhaya C. Patil & Ors, the Respondents contend that the G.R. dated 14.05.2012 and 23.03.2016 do not enure for the benefit of the Applicant, as the same are restricted to the employees named in G.Rs. only.

**5.** Shri M.D. Lonkar, learned Advocate for the Applicant submits that even if the nomenclature of the appointment order of the Applicant is on contract basis, admittedly, the appointment was made by issuance of Advertisement inviting the applications and it cannot be termed as 'backdoor entry'. He further submits that **only because the Applicant was later appointed through MPSC, it cannot work to his disadvantage in view of regularization of services of Smt. Chhaya Patil & Ors,** who were initially appointed purely on contract basis. Thus, according to him, the denial of service benefits now claimed by the Applicant is amount to discrimination, violative of Article 14 of the Constitution, and therefore, prayed to allow the O.A. in terms of reliefs reproduced above.

**6.** Per contra, Ms. N.G. Gohad, learned P.O. submits that the Applicant having accepted the appointment on **contract basis** knowing terms and conditions, now he cannot ask for regularization of the services rendered purely on contract basis. **According to her, since the Applicant is appointed on regular basis through MPSC, by order dated**

**10.09.2007, he is not entitled to the benefit of earlier period.**

**7.** In view of the submissions advanced, the question posed whether the Applicant is entitled to the relief claimed.

**8.** Indisputably, the Applicant had applied for the post of Assistant Professor in terms of Advertisement dated 01.06.2002 (Page No.105 of P.B.). Material to note that as per Advertisement, **the posts were to be filled in on ad-hoc basis** and it does not have any reference of appointment on contract basis. Further, material to note that those posts were to be filled-in on ad-hoc basis to fill in the then vacant posts which were also subject to change. Suffice to say, the post for which applications were invited on ad-hoc basis were vacant posts. Indeed, the learned P.O. made a statement that because of ban on recruitment, the posts were required to be filled in on ad-hoc basis. **Thus, the appointment of the Applicant was against the clear vacancy.** There is no denying that the Applicant possesses all required requisite qualification.

**9.** In pursuance of said Advertisement, the Applicant participated in the process and was appointed by order **dated 01.06.2002 on contract basis instead of ad-hoc employee.** Here, pertinent to note that as per appointment order dated 22.08.2002 (Page No.50-A of P.B.), the appointment was made in pursuance of selection by Selection Committee. Thus, it was not backdoor entry and due process was followed to fill-in the posts. All that, difference is that instead of issuing appointment on ad-hoc basis, the Applicant was appointed on contract basis by order dated 22.08.2002. Thereafter, for five years, fresh appointment orders were issued subject to same terms and conditions on contract basis excluding Summer Vacation period. Subsequent development is that the **Applicant got selected through M.P.S.C. on regular basis by order dated 10.09.2007** (Page No.43 of P.B.) and since then, he is in continuous service.

**10.** The Applicant's case is based on the treatment given by the Respondents to similarly situated persons viz. Dr. Vishakha S. Saoji, Dr. Mamta D. Upgade, Smt. Chhaya C. Patil, Smt. Anita Malge and Shri Bhimrao Patil. These persons were also appointed in pursuance of same Advertisement dated 01.06.2002. However, their services were regularized by the Government at it own by G.R. dated 14.05.2012 (Page No.54 of P.B.). Preface of order dated 14.05.2012 is material, which is as follows:-

*"उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय महाविद्यालये/संस्था यातील नियमित स्वरूपाची अध्यापकांची रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे भरली जाईपर्यंत विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून जाहीरात देऊन तात्पुरत्या कालावधीसाठी हंगामी पद्धतीने भरण्याची पद्धत दि. २५.०७.२००२ पूर्वी अस्तित्वात होती. या पद्धतीस अनुसरून दि. ०१.०६.२००२ रोजी उच्च शिक्षण संचालनालयातर्फे देण्यात आलेल्या हंगामी/तात्पुरत्या स्वरूपातील अधिव्याख्याता पदाच्या भरतीसाठी दिलेल्या जाहिरातीस इतर उमेदवारांबरोबर प्रतिसाद देऊन डॉ. विशाखा सुभाष सावजी, डॉ. ममता दत्तात्रय उपगडे, श्रीमती छाया चंद्रकांत पाटील, श्रीमती अनिता मोतीरामजी मालगे व श्री. भिमराव महादेव पाटील या ५ उमेदवारांनी अर्ज केले. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने ज्या अधिव्याख्यात्यांच्या नियुक्त्या केल्या गेल्या त्या अधिव्याख्यात्यांना हंगामी संबोधुन नियमित वेतनश्रेणी देण्यात आली. तसेच न्यायालयीन आदेशास अनुसरून त्यांना दि. २९.०८.२००१ च्या शासननिर्णयान्वये वार्षिक वेतनवाढीही सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने देण्यात आल्या आहेत. तथापि, प्रस्तुत ५ उमेदवारांची, नियुक्ती प्रक्रिया हंगामी नियुक्त्यांप्रमाणे केल्यानंतर तात्पुरत्या*

## *महाराष्ट्र शासन : उच्च शिक्षण संचालनालय*

मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य पुणे - ४११००१

Web : www.dhepune.gov.in E-mail : vidhi.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९

फॅक्स नं. ०२०/२६११११५३

क्र. उशिसं/२०२०/नेटसेट न्या.प्र./औवि/विशि./४३८९

**दि. १६.०६.२०२०**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.

**विषय** :- शासननिर्णय दि. २७.०६.२०१३ व त्यानुसार बिगर नेट/सेट अधिव्याख्याते यांच्या प्रकरणांबाबत.

**संदर्भ** :- संचालनालयाचे समक्रमांक पत्र दि. १३ मार्च, २०२०.

प्रस्तुत विषयात कळविण्यात येते की, शासननिर्णय दि. २७.०६.२०१३ अन्वये दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अधिव्याख्याते यांच्या सेवा संदर्भात आपल्या विभागाशी संबंधित माहिती संचालनालयाच्या संदर्भीय पत्राद्वारे मागविण्यात आली होती. प्राप्त माहिती शासनास सादर केली असता काही मुद्यांबाबत सविस्तर माहिती नमूद करणे आवश्यक असल्याचे कळविण्यात आले आहे. तरी आपण यापूर्वी सादर केलेल्या माहितीबाबत खाली नमूद केलेल्या मुद्यांसंदर्भात खुलासा सादर करणे आवश्यक आहे जेणेकरून शासनास परिपूर्ण अहवाल सादर करणे सोयीचे होईल.

**मुद्दा क्र. १** : शा. नि. दि. २७.६.२०१३ पूर्वी सेवानिवृत्त झालेले बिगर नेट/सेट अधिव्याख्याते : सद्यस्थितीमध्ये सेवानिवृत्ती वेतन देण्यात येत आहे किंवा कसे? याबाबत सविस्तर अहवाल.

**मुद्दा क्र. २** : शा. नि. दि. २७.६.२०१३ नंतर सेवानिवृत्त झालेले बिगर नेट/सेट अधिव्याख्याते : सद्यस्थितीमध्ये सेवानिवृत्ती वेतन देण्यात येत आहे किंवा कसे? याबाबत सविस्तर अहवाल.

**मुद्दा क्र. ३** : शा. नि. दि. २७.६.२०१३ च्या अनुषंगाने बिगर नेट/सेट अधिव्याख्याते यांना DCPS क्र. देणेबाबत : शा. नि. दि. २७.६.२०१३ च्या अनुषंगाने संबंधितास DCPS क्र. कोणत्या कारणास्तव देण्यात आला नाही?

**मुद्दा क्र. ४** : शा. नि. दि. २७.६.२०१३ नंतर GPF क्र. देण्यात आलेले अधिव्याख्याते यांचे संदर्भात : GPF क्र. दिल्याबाबत प्रकरणनिहाय खुलासा सादर करावा.

तरी सदरची माहिती **दि. १७ जून, २०२० पर्यंत 'न चुकता'** खाली नमूद केलेल्या ई-मेल वर संचालनालयास सादर करावी.

ई-मेल : 1. vishi.dhepune@gov.in

2. anandadsule574@gmail.com

(प्रमिला मराठे)
प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १

## *महाराष्ट्र शासन*
## *सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,*

जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१

दुरध्वनी क्रमांक : ०७१२-२५६१७१३

Website : www.jdnagpur.in

Email : jdhengp@rediffmail.com, Email : rjdng.dhepune@gov.in

क्रमांक :- उशिनाग/वेतनपथक/२११८/२०२०

**दिनांक : १७ जून २०२०**

ई-मेलद्वारे/अतितात्काळ

प्रति,

(१) कुलसचिव, रा.तु.म.नागपूर विद्यापीठ/कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक/महाराष्ट्र विधी विद्यापीठ, नागपूर/गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली (२) प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये, नागपूर विभाग

**विषय** :- शासननिर्णय दि. २७.०६.२०१३ व त्यानूसार बिगर नेट/सेट अधिव्याख्याते यांच्या प्रकरणांबाबत.

**संदर्भ** :- संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/२०२०/नेटसेट न्या.प्र./औवि/विशि./५३८९, दिनांक १६.०६.२०२०

संदर्भिय पत्राचे कृपया अवलोकन करावे. (प्रत संलग्न)

त्याअनुषंगाने नागपूर विभागातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शासननिर्णय दिनांक २७ जून २०१३ अन्वये दिनांक २३.१०.१९९२ ते ०३.०४.२००० या कालावधीत आपल्या महाविद्यालयात नेमणूक केलेल्या अधिव्याख्यात्यांबाबत संदर्भिय संचालनालयाचे पत्रात नमूद केलेल्या मुद्दा क्र. ०१ ते ०४ ची माहिती **आजच दिनांक १७.०६.२०२० रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत** या कार्यालयास ईमेलद्वारे न चुकता सादर करावी. सदरची माहिती विहित कालावधी मध्ये न सादर केल्यास आपल्या महाविद्यालयासंबंधित माहिती निरंक सादर करण्यात येईल व याबाबतची सर्वस्वी जबावदारी आपली राहील, याची नोंद घ्यावी.

**सहपत्र - वरीलप्रमाणे**

(डॉ.महेशकुमार साळुंखे)
सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना संदर्भिय पत्रान्वये माहितीस्तव सविनय सादर.

*स्वरूपात भरावयाची अधिव्याख्यात्यांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याचा दि. २५.०७.२००२ चा शासननिर्णय अस्तित्वात आल्याने त्यांना हंगामी स्वरूपात नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती न देता रू. ८०००/- एवढ्या ठोक वेतनावर कंत्राटी स्वरुपात नियुक्ती देण्यात आली. सदर त्रुटी दुर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती."*

**On the above background, the Government by G.R. dated 14.05.2012 regularized the services of the Applicant in pay scale of Rs.15600-39400** subject to clarification that they will not be entitled for arrears of pay scale.

**11.** After issuance of G.R. dated 14.05.2012, those employees have filed ***Writ Petition No.526/ 2015*** before the Hon'ble High Court, Bench at Nagpur for permanency as by G.R. dated 14.05.2012, their appointment was subject to until further orders and on availability of regular candidate from MPSC it was came to an end. In ***Writ Petition No.586/2015,*** they claimed direction to regularize their services from the date of their initial appointment along with consequential benefits. The said Writ Petition was allowed by Hon'ble High Court on 03.09.2015. The observation and finding recorded by Hon'ble High Court is as follows:-

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचारी आणि निवृत्तिवेतनधारकांना सातवा वेतन आयोग थकबाकीचा २ रा हप्ता प्रदान करणेबाबत.*

## *महाराष्ट्र शासन : वित्त विभाग*

शासन निर्णय क्रमांक : वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९ : मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**दिनांक :- २३ जून २०२०**

**वाचा** :- (१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : वेपुर-२०१८/ प्र.क्र.४४/सेवा-९, दिनांक : १ जानेवारी, २०१९ (२) वित्त विभाग, शासन अधिसूचना क्रमांक : वेपूर २०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दिनांक : ३० जानेवारी, २०१९ (३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : वेपुर-२०१९/प्र.क्र.८/ सेवा-९, दिनांक : २० फेब्रुवारी, २०१९ (४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दिनांक : ३० मे, २०१९

**प्रस्तावना** : संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन अधिसूचनेन्वये शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन सुधारणा समिती, २०१७ (बक्षी समिती) च्या शिफारशींनुसार सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आल्या आहेत. या सुधारित वेतन संरचनेनुसार अनुज्ञेय सुधारित वेतन दिनांक १ जानेवारी २०१९ पासून रोखीने प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी २०१६ पासून सुधारित वेतन संरचना लागू केल्यामुळे **दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीतील अनुज्ञेय ठरणारी थकबाकी सन २०१९-२०२० या आर्थिक पासून पुढील ५ वर्षांत ५ समान वार्षिक ५ समान हप्त्यांत प्रदान करण्यात येणार आहेत.** थकबाकी प्रदानाबाबतच्या सविस्तर सूचना संदर्भाधीन क्रमांक ३ येथील परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भाधीन क्रमांक ४ येथील परिपत्रकान्वये राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अथवा परिभाषित अंशदायी निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना रोखीने थकबाकी प्रदानासंबंधी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

राज्यात कोवीड-१९ विषाणूच्या साथीमुळे उद्‌भवलेली समस्या व त्यामुळे राज्याच्या महसूली जमेवर झालेला प्रतिकुल परिणाम विचारात घेऊन राज्य शासकीय कर्मचारी, इतर पात्र कर्मचारी आणि सर्व प्रकारच्या निवृत्तिवेतनधारकांना दिनांक १ जुलै, २०२० रोजी देय असलेल्या ७ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या दुसऱ्या हप्त्याचे प्रदान पुढे ढकलण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय** : शासन असे आदेश देत आहे की, **राज्य शासकीय कर्मचारी, इतर पात्र कर्मचारी आणि सर्व प्रकारच्या निवृत्तिवेतनधारकांना दिनांक १ जुलै, २०२० रोजी देय असलेल्या ७ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या दुसऱ्या हप्त्याचे प्रदान १ वर्ष पुढे ढकलण्यात येत आहे. सदर हप्ता प्रदान करण्यासंदर्भात स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.**

२. सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२००६२३१८३०१९४५०५ हा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(इंद्रजित गोरे)

*** AF : P 071 *** शासनाचे उपसचिव

*"The petitioners were appointed by the respondents in the year 2002 and the petitioners are serving till date. It is stated on behalf of the petitioners that in similar set of facts where the appointments of lecturers were made in the departments of the Government Polytechnic in the State of Maharashtra, the services of the lecturers were protected in view of the judgment dated19.10.2013 in Writ Petition No.2046/ 2010. It is stated that the facts involved in the decided cases are similar to the facts involved in this case and the petitioners would also be entitled to the regularization of their services."*

*"On hearing the learned Counsel for the parties and on a perusal of the petition, it appears that the case of* ***the petitioners herein stands squarely covered by the judgment dated19.10.2013 in Writ Petition No.2046/2010 and the petitioners would also be entitled to the regularization of their services.*** *The statement made by the learned Assistant Government Pleader that since there is a condition in the appointment order of the petitioners that the appointment of the petitioners is subject to the availability of the candidates from the M.P.S.C. the case would not be covered by the aforesaid judgment, is not well founded and is liable to be rejected. Merely because there is a condition in the appointment order, the case of the petitioners cannot be distinguished.* ***The said fact could not be relevant for deciding the issue involved in this case, as the same stands decided by the judgment dated 19.10.2013 in Writ PetitionNo.2046/2010."***

*"Hence, for the reasons aforesaid, the writ petition is partly allowed. The respondents are directed to regularize the services of the petitioners and confer permanency. The respondents are directed to absorb the petitioners in service within a period of six weeks, on parity with the petitioners in Writ Petition No.2046/2010.* ***Since the petitioners are in continuous employment, the petitioners should be continued in service as the regular employees.*** *We direct the respondents to pay the regular salary to the petitioners from 1.9.2015. Though the petitioners would be entitled to continuity in service, the said continuity would be for purposes other than monetary purposes. Order accordingly."*

**12.** Material to note that the decision in ***Writ Petition No.526/2015*** **was accepted and implemented by the Government by issuing G.R. dated 23rd March, 2016** (Page No.56 of P.B.). There is a reference of decision in ***Writ Petition No.526/ 201****5* in G.R. dated 23rd March, 2016. In the said G.R. dated 23.03.2016, **there are also reference of various other decisions whereby the services of employees were regularized and the benefit of permanency was conferred.** In so far as Dr. Vishakha S. Saoji and 4 others who are similarly situated persons are concerned, their services were regularized w.e.f. their initial appointment in 2002. There is specific stipulation in G.R. dated 23.03.2016 that they will be entitled to pension scheme existing on the date of regularization of their service. Thus, in view of regularization of service w.e.f. 2002 (date of initial appointment on ad-hoc basis in pursuance of same Advertisement), the services of Dr. Vishakha Saoji and 4 others were regularized and the benefit of permanency as well as pension scheme existing in 2002 i.e. regular pension scheme was granted.

**13.** Thus, the Applicant is similarly situated person who was appointed in pursuance of same Advertisement but left out from G.R. dated 23.03.2016 because of his selection through MPSC in 2007. He made representation to extend the same benefit to him. Only difference is that the Applicant was appointed by giving nomenclature on contract basis whereas, Dr. Vishakha S. Saoji & 4 others were appointed another nomenclature of ad-hoc basis. They were also on consolidated salary alike the Applicant. As such, one should not be influenced by the nomenclature as to whether it is on contract basis or on ad-hoc basis. **The essence of the matter is that the Applicant being exactly similarly situated person entitled to same relief.** Therefore, such distinction made in appointment order hardly matters to deny the Applicant the relief granted to Dr. Vishakha S. Saoji & 4 others. Suffice

to say, the submission advanced by the learned P.O. that the Applicant being appointed on contract basis, he is not entitled to the benefit at par with Dr. Vishakha Saoji & 4 others is totally unjust, arbitrary and unsustainable.

**14.** Thus, what transpires from the record that the services of Dr.Vishakha Saoji & 4 others were regularized and all benefit of permanency were granted to them, but the Applicant is left out only because he was appointed through MPSC on regular basis in 2007. If the fact of selection of the Applicant through MPSC in 2007 is considered as a ground for denying relief claimed by him, then it amounts to subjecting the Applicant to disadvantage position as if he has committed mistake by participating in selection process of MPSC in 2007. Had he not selected through MPSC in 2007 and was sailing in the same boat alike Dr.Vishakha Saoji & 4 others, his case being not different he would have been conferred with the relief of regularization in the same manner as done by the Government vide G.R. dated 14.05.2012. Indeed, the Applicant is on better footing, as he was selected through MPSC on merit in 2007, and therefore, this aspect cannot be taken as shelter by the Government so as to deny him the benefits which are conferred on Dr.Vishakha Saoji & 4 others, who are exactly similarly situated employees.

**15.** Later, by G.R. dated 23.03.2016, the Government had conferred the benefit of permanency to Dr. Vishakha Saoji and others on the basis of decision in ***Writ Petition No.526/2015 dated 03.09.2015.*** As the Applicant was already appointed through MPSC in 2007, there was no need for him to join those Petitioners in ***Writ Petition No.526/2015.*** However, the fact remains that the Applicant and Dr. Vishakha Saoji & 4 others are similarly situated employees, and therefore, the benefit of decision of Hon'ble High Court rendered in ***Writ Petition No.526/2015*** deserves to be granted to the Applicant, particularly when the decision in ***Writ Petition No.526/2015*** has been implemented by the Government by issuance of G.R. dated 23.03.2016. **This being the position, the denial of service benefits to the Applicant on par with Dr. Vishakha Saoji & 4 others would be definitely violative of Article 14 of the Constitution. The Government cannot adopt pick and choose approach and being model employer is bound to confer same benefits on other similarly situated employees,** as held by Hon'ble Supreme Court in ***State of Uttar Pradesh and others Vs. Arvind Kumar Shrivastava : (2015) 1 SCC 347*** wherein the Hon'ble Supreme Court laid down the following legal principles in the matter of service jurisprudence.

*"The most question that requires determination is as to whether the approach of the Tribunal and the High Court was correct in extending the benefit of earlier judgment of the Tribunal, which had attained finality as it was affirmed till the Supreme Court. The legal principles that can be culled out from the judgments cited both by the appellants as well as the respondents, can be summed up as under :*

*(i)* ***Normal rule is that when a particular set of employees is given relief by the Court, all other identically situated persons need to be treated alike by extending that benefit. Not doing so would amount to discrimination and would be violative of Article 14 of the Constitution of India.*** *This principle needs to be applied in service matters more emphatically as the service jurisprudence evolved by this Court from time to time postulates that all similarly situated persons should be treated similarly.* ***Therefore, the normal rule would be that merely because other similarly situated persons did not approach the Court earlier, they are not to be treated differently.***

*(ii) However, this principle is subject to well recognized exceptions in the form of laches and delays as well as acquiescence. Those persons who did not challenge the wrongful action in their cases and acquiesced into the same and woke up after long delay only because of the reason that their counterparts who had approached the Court earlier in time succeeded in their efforts,* ***then such employees cannot claim that the benefit of the judgment rendered in the case of similarly situated persons be extended to them. They would be treated as fence-sitters and laches and delays, and/or the acquiescence, would be a valid ground to dismiss their claim.***

*(iii)* ***However, this exception may not apply in those cases where the judgment pronounced by the Court was judgment in rem with intention to give benefit to all similarly situated persons, whether they approached the Court or not.*** *With such a pronouncement the obligation is cast upon the authorities to itself extend the benefit thereof to all similarly situated person. Such a situation can occur when the subject matter of the decision touches upon the policy matters, like scheme of regularisation and the like (see K.C. Sharma & Ors. v. Union of India(supra). On the other hand, if the judgment of the Court was in personam holding that benefit of the said judgment shall accrue to the parties before the Court and such an intention is stated expressly in the judgment or it can be impliedly found out from the tenor and language of the judgment, those who want to get the benefit of the said judgment extended to them shall have to satisfy that their petition does not suffer from either laches and delays or acquiescence."*

**16.** As such, the claim of the Applicant for the relief claimed on par with Dr. Vishakha Saoji & 4 others can hardly be questioned. The issue of consideration of past service for the benefit of Time Bound Promotion is no more res-integra in view of settled legal position. In this behalf, the decision of Hon'ble High Court in ***Writ Petition No.9051/2013 (State of Maharashtra Vs. Meena Kuwalekar with other connected Writ Petitions)*** is material having bearing over the present issue. In the said Judgment, the Hon'ble High Court heavily came down upon the approach of the Government of picks and choose policy and discrimination meted out to the employees for refusal to consider their initial service before regular appointment. In Para No.29 of the Judgment, the Hon'ble High Court held as follows :-

*"29. In fact, the record indicates that the State Government has adopted a 'pick and choose' approach in such matters. As per the statistics provided by the respondent – employees, the State Government has extended the benefit under TBPS and/or ACPS to several of its employees by taking into consideration services from the date of their initial appointment. Such statistics have not been disputed by the State Government, despite opportunity. At a belated stage the State Government has placed on record a letter addressed to Mr. Kumbhakoni to suggest that the benefits were extended only incompliance with the orders made by the MAT or this Court. The information furnished neither appears to be complete nor candid. In any case, even if this position is to be accepted, it is quite clear the State Government has again adopted a 'pick and choose' approach in the matter of challenges to the decisions of the MAT in favour of the employees. In some cases, the State Government has challenged the decisions of the MAT before this Court but in others, the decisions have been implemented without demur. Similarly, even after the challenge to the decisions of this Court in the case of* ***Nanda Chavan*** *(supra) and connected matters failed before the Hon'ble Supreme Court, though the issues of law raised in the special leave petitions were kept open, the State Government did not challenge the subsequent decision in the case of* ***Sushma Kumar Arya*** *(supra),thereby extending the benefit of TBPS and/or ACPS to the said employee, placed in a situation similar to the respondent – employees in the present case. Similarly, there is no record of the State Government questioning the decision of this Court in the case of* ***Pushpalata Sonawale*** *(writ petition no. 4455 of 2009), who was again, an employee placed in a similar situation to the respondent –employees in the present case. In the light of such 'pick and choose' approach on the part of the State Government,* ***we do not feel that this is a fit case to interfere with the impugned orders, particularly as interference might result in discrimination between a uniform class of employees, in the matter of extension of benefits under TBPS and/or ACPS. The record indicates that such benefit has been extended by the State Government to hundreds of its employees by taking into consideration service from the date of initial appointment."***

**17.** The learned Advocate for the Applicant has further referred to the decision rendered by this Tribunal in ***O.A.No.34/2016 (Rajasaheb Marotkar Vs. State of Maharashtra) decided on 14.02.2017,*** wherein the benefit of regularization was granted considering initial period of appointment. In that case, the Applicant Rajasaheb Marotkar was appointed on ad-hoc basis in 2001 and continued upto 2013 i.e. till he was appointed through MPSC. The Tribunal referred the decision of Hon'ble High Court in ***Writ Petition No. 9051/2013*** in ***Meena Kuwalekar's*** case (cited supra) and granted the relief. In that case, there was break of four days in service, which was also condoned.

**18.** As regard condonation of break in the matter of Applicant, the break was of Summer Vacation. He was appointed in 2002 and continued on contract basis upto 2007 except Summer break. As per the Chart (Page Nos.73 & 74 of P.B.), the total period of break is 177 days and it does not exceed one year. Indeed, in the matter of Dr. Vishakha Saoji & 4 others, who were similarly situated employees, the Hon'ble High Court in ***Writ Petition No.526/2015*** granted the benefit of continuity in service. The Applicant being similarly situated person, I have seen no reason to deny the said benefit to him.

**19.** In view of above, I have no hesitation to sum-up that the Applicant's employment from 24.08.2002 to 10.09.2007 deserves to be treated as ad-hoc employment worth to consider for grant of benefit of ACPS and the technical break of Summer Vacation in between appointment order deserves to be condoned for the benefit of continuity of service except consequential monetary benefits in the form of payment of increment and pay fixation in the said period. Similarly, he is entitled for old pension scheme i.e. Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 on par with Dr. Vishakha Saoji & 4 others. The O.A, therefore, deserves to be allowed partly. Hence, the following order.

**ORDER**

(A) The Original Application is allowed partly.

**(B) It is hereby declared that the period of employment of the Applicant from 24.08.2002 to 10.09.2007 be treated as adhoc employee for consideration of the benefit of Time Bound Promotion.**

(C) The Applicant's break in service of Summer Vacation being of technical nature and beyond the control of Applicant deserves to be condoned for the purpose of continuity in service except for monetary benefits in the form of payment of yearly increment and pay fixation.

(D) The Applicant is held entitled for old pension scheme i.e. M.C.S. (Pension) Rules, 1982.

(E) No order as to costs.

Sd/-
**(A.P. KURHEKAR)**
**Member-J**

Mumbai
Date : 06.03.2020
Dictation taken by : S.K.Wamanse.

# Professor D. Surya Rao : A Great Legend of Post Modern Era finally comes to end

Dear Shiva Rao Sir,

One cannot easily believe the sad news of the demise of Prof. D. Surya Rao. I got shock to hear that this great legend is no more. I had a deep reverence for him. More than a person, he was a personality, a true human being radiating virtues in the attire of common man. The aroma of his virtues wafted in the society through his behaviour and treatment. He was the man of noble tradition who never differentiated between the poor and the rich; the caste and the creed. He was compassionate to the needy and beggars. He always took pleasure in giving to others rather taking. I was the first research student to make Ph.D on his novels from Maharashtra. So I got the opportunity to stay with him twice at Vijaywada, each stay of week.

I remember the occasion in 2009 when I first came to meet him. I hired a room in the hotel and stayed there. I purchased a bouquet to offer him, while meeting he said, "why did you bring this? There was no need of all these. A word was sufficient". I still remember those words. So simple was his living. Then he asked me where I was staying. I told him, Sir I took a room in a nearby hotel (Some Gopi Nagar or Gopal Puri near Collector Office). "You cannot stay there. You are my guest. Leave that and come here with your all luggage. Otherwise I would have to come", he said. I had no other alternative to stay with him. And then for the whole week I stayed with him, enjoyed food with the blessings of Amma taking all precautions of dish what a Maharashtrian prefers. For the whole week, I never thought of being away from home. Twice thrice I went for outing with him in rikshaw just to kill time.

What I noticed was whenever any beggar would come to him; he used to give him coin. Once I asked, "Sir, every time?" He said, "God has sent us on earth to help others. It is fortunate that we are on the donor's side, not the receiver. The wheel of fortune always keeps on moving. May be some or other day, we can be to that side also. So whenever and wherever we get chance to give; don't miss the opportunity; give others whatever you can. It is god's wish He does that act through us." and he explained me the Karma philosophy while in rikshwa, i.e. Niskam Karma Yoga. Never expect anything from others or don't bother about the result and go on doing good things in life. God is there to observe all these things and some or other day He would help you in any form at any occasion.

You would realize that it is the returns of God. While writing these lines, I couldn't resist my feeling and burst into tears when I remembered him. During the stay, he continually shared his thoughts of novels, told the background of various stories of Jamindar family, Krishna Lanka, his travel in India and various experiences associated with it. In fact, he travelled me from all on which his novels are based. What a vast store of knowledge! Variety of words, deep study of Indian and foreign literature, everything was on his fingertips. I was happy to get first-hand experience of such a great author. His words had clarity, gravity; the confidence was showing his vast experience of academic and administrative positions. Each experience had some memories attached with it.

He was a man of simple living but strict and martinet. A true generous person he was with a great magnanimity of human heart, always fought against the wrongs without compromising with his principles, stood with the truth even in the odds. In Maharashtra, everyone from politician to academician knows him by the name 'Rao Sir'. Still a lot to tell about him. He would be always remembered as a great person in the academic arena through his thoughts perished in his novels for posterity. Such a legend cannot die. I bow in front of him and pay homage to Prof. D. Surya Rao.

I pray Almighty God to give strength to Amma, Dear Shiva Rao Sir and his whole family members to bear this unrepairable loss and may the departed soul rest in peace for ever.

In loving memories,

Dr. Yogesh M. Sarode
Devgram (Maharashtra)

# संघटनेचे ज्येष्ठ सभासद प्रा.डी.एस.राव यांचे दुःखद निधन

*नबिरा महाविद्यालय, काटोल येथील इंग्रजी विषयाचे माजी विभाग प्रमुख व संघटनेच्या संघर्षमय काळातील पहिल्या फळीतील एक नामवंत सभासद व इंग्रजी विषयाचे एक ख्यातकिर्त प्राध्यापक प्रा.श्री.डी.एस.राव यांचे विजयवाडा येथे वयाच्या ९६ व्या वर्षी दिनांक १ जुलै २०२० रोजी दुःखद निधन झाले. प्रा.डी.एस.राव हे किती जागरूकपणे संघटनात्मक कामामध्ये सहभागी होत असत याविषयीचे काही उल्लेख प्रा.बी.टी.देशमुख यांनी शब्दबद्ध केलेल्या "वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना" या लेखमालेमध्ये समाविष्ट आहेत. "वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना विशेषांक" या नुटा बुलेटीनच्या आगामी विशेषांकाचे प्रकाशन प्रस्तावित असून त्याबाबतची सर्व लेखनसामुग्री ही अध्यक्षांच्या सुपूर्त करण्यात आलेली आहे. या लेखमालेतील परिच्छेद ३१ ते ३८ मी सोबत प्रकाशित करीत आहे. प्रा.डी.एस.राव यांच्या एका विद्यार्थ्याने त्यांच्या विषयी लिहिलेला एक लहानसा लेखसुद्धा याच अंकात प्रकाशित केलेला आहे.* ***- डॉ. प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष, 'नुटा'***

## ॲडहॉक कमेटीची कार्यरिती

**३१.** एकदा सर्व विषयांच्या तासिका दिनांक ७ व ८ ऑगस्ट १९७६ रोजीच्या बैठकीमध्ये निश्चित झाल्यानंतर समितीचे कामकाज जोरात सुरू झाले. समितीने ठरविलेली कार्यरिती पुढीलप्रमाणे होती :-

(१) समितीने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विहित नमुन्यात कामाचे वाटप करावे. (२) याबाबतचे विवरणपत्र समितीसमोर सादर करावे. (३) त्या विवरणपत्रामध्ये प्रत्येक शिक्षकाची स्थिती निश्चित केलेली असावी. (४) असे करतांना प्रत्येक शिक्षकाला त्याची स्थिती विहित नमुन्यात व्यक्तीशः कळवावी व त्याबाबतची पोच घेतल्याची प्रत समितीसमोर सादर करावी. (५) स्थिती कळविण्यात आल्या दिवसापासून १५ दिवसांच्या आत त्या शिक्षकाने अर्जाद्वारे आपले काही म्हणणे असल्यास प्राचार्यामार्फत समितीकडे ते दाखल करावे. (६) ते दाखल करतांना त्यासोबतच प्राचार्यांचे त्याबाबत जे काय म्हणणे असेल तेही प्राचार्यांनी समितीसमोर दाखल करावे (७) अशा प्रत्येक अर्जाची प्राचार्यांसमक्ष समितीसमोर सुनावणी होऊन त्या शिक्षकाचे म्हणणे ऐकून त्याबाबत समिती आपला अंतिम निर्णय देईल. अशी ही कार्यरिती होती.

## इंग्रजीच्या शिक्षकांमध्ये असंतोष

**३२.** नागपूर विद्यापीठाच्या कॉनव्होकेशन हॉलमध्ये शिक्षकांची मोठी गर्दी रोज पहायला मिळत असे. पहिल्या मजल्यावरील समिती कक्षात समितीचे कामकाज चालत असे. समितीचे कामकाज पारदर्शक पद्धतीने चालत असल्यामुळे सर्वच निकष सर्वांनाच ज्ञात झालेले होते. इंग्रजी विषयाच्या शिक्षकांमध्ये त्यामुळे तीव्र असंतोष निर्माण झालेला होता. "**१० विद्यार्थ्यांची तुकडी व एका तुकडीला आठवड्याला दोन तासिका**" हा नियम बदलवून "**२५ विद्यार्थ्यांची तुकडी व आठवड्याला एक तासिका**" असा नवा नियम तयार करण्याचा अधिकार या समितीला कोणी दिलेला आहे? ह्या प्रतिपादनावर हा असंतोष आधारित होता व तो नियमाला धरून होता.

## शिक्षक प्रतिनिधींचे प्रतिपादन

**३३.** इंग्रजी विषयाच्या शिक्षकांच्या या असंतोषाला तोंड देण्याचे टाळणे आम्हा शिक्षक प्रतिनिधींना शक्य नव्हते. आपण अतिरिक्त ठरविले जाऊ व जो अतिरिक्त ठरेल त्याला काढून टाकण्याचे आदेश शासनाने यापूर्वीच दिलेले आहेत, याची माहिती असल्यामुळे हा असंतोष अत्यंत तीव्र व आक्रमकपणे व्यक्त होत होता. मी स्वतः, प्रा.अरविंद बारहाते व प्रा.आर.जी.तट्टे अशा आम्ही तीघांनी खाली हॉलमध्ये उपलब्ध असलेल्या ३०-४० इंग्रजीच्या प्राध्यापकांची तेथेच हॉलच्या एका कोपऱ्यात बैठक घेतली. आम्ही या शिक्षकांना असे सांगितले की, "शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्याची ही प्रक्रिया हे एक मोठे संकटच आहे. अशा वेळी प्रत्येक शिक्षकाने जागरुकपणे काम केले पाहिजे. आम्ही शिक्षक प्रतिनिधी म्हणून अतिशय जागरुकपणे या समितीत काम करीत आहोत. इंग्रजी या विषयाच्या स्वाध्याय तासिकांबाबतचा समितीचा निर्णय हा एकमताचा निर्णय आहे. त्यामुळे आम्ही त्या निर्णयाला बांधील आहोत. प्रत्येक शिक्षकाला व्यक्तिशः त्याची स्थिती समितीच्या आदेशाप्रमाणे कळविण्यात आलेली आहे. त्यामध्ये नियमाला सोडून काहीही झाले असेल तर व्यथित शिक्षकांनी जागरुकपणे त्याबाबतच्या तक्रारी समितीसमोर नोंदविल्या पाहिजेत. यात हयगय होता कामा नये." या लहानशा सभेमुळे त्या शिक्षकांचे त्यावेळी किती समाधान झाले असेल ते काही मला सांगता येणार नाही. पण इंग्रजीच्या प्रत्येक शिक्षकाला वेगवेगळे समजावून सांगण्याच्या कामातून आम्हा तीनही शिक्षक प्रतिनिधींना मुक्तता मिळाली हे मात्र निश्चित. या लहानशा सभेमुळे शिक्षक प्रतिनिधींचे काय म्हणणे आहे? हे सर्वांपर्यंत पोचले. संकटकाळात संदेशांचे दळणवळण फार वेगाने होते, हे दिसून आले.

## इंग्रजीच्या एका नामवंत शिक्षकाने नोंदविलेली तक्रार

**३४.** संघटनाशास्त्राप्रमाणे जीवंतपणा व जागरुकता हे गुण असलेला प्रत्येक सभासद संघटनेचे वैभव वाढवित असतो. आम्ही जेव्हा तक्रार करायला सांगतो तेव्हा त्यात काही अर्थ असला पाहिजे असे समजून अतिरिक्त ठरण्याची शक्यता असलेल्या इंग्रजीच्या बहुतेक शिक्षकांनी आपापले म्हणणे लेखी निवेदनाद्वारे समितीसमोर मांडले. त्यातील एखादे निवेदन व त्यावर समितीचा निर्णय, नमुना म्हणून उधृत करावा यासाठी अशा निवेदनांचा ढीग ज्यावेळेला मी आज पहातो, त्यावेळी विभागप्रमुख म्हणून काम करीत असल्याने अजिबात अतिरिक्त ठरण्याची शक्यता नसलेल्या संघटनेच्या एका जागरुक व नामवंत सभासदाने सादर केलेले एक निवेदन समोर येते. काटोल येथील इंग्रजी विषयाचे विभागप्रमुख व संघटनेचे एक ज्येष्ठ सभासद प्रा.डी.एस.राव यांनी दिलेले हे निवेदन चांगलेच रेखीव आहे. नियम काय आहेत? समितीने काय केलेले आहे? ते कसे चुकीचे आहे? याची मोठी बिनचूक नोंद त्यांच्या निवेदनात आहे. हे निवेदन त्यांनी उच्च शिक्षण संचालकांना व मा.कुलगुरूंना व समितीला सादर केले होते. दिनांक २९ सप्टेंबर १९७६ रोजी झालेल्या बैठकीत पूर्ण ॲडहॉक कमेटीने "नबिरा महाविद्यालय, काटोलसाठीच्या उपसमितीचा अहवाल क्रमांक ४८" **विचारात घेतला व संमत केला.** संमत केलेल्या त्या अहवालातील इंग्रजी या विषयाबाबतचा भाग मी शब्दशः उधृत करू इच्छितो. तो पुढीलप्रमाणे:-

**"Nabira Mahavidyalaya, Katol :** This college has all three Faculties of Arts, Commerce, and Science. The Principal Shri. G.N.Chandak was present when some statements were recorded before committee.

**Department of English**

(1) The workload returned is of 31 periods, presumably for all the Faculties. **Shri Rao who is the seniormost teacher in the Department in the grade of Rs. 400-800 has sent a letter to the Director of Higher Education, Maharashtra on 20th August, 76 with a copy to the Vice-Chancellor. He has made a complaint in his letter protesting against the change in the norms assumed by the Ad-hoc Committee which a college was asked to follow contrary to what is laid down by the University for the academic year 1975-76.**

He has made this grievance pointedly in respect of calculation of workload for English language. **According to Shri Rao, the University prospectus for 75-76 prescribed 4 lectures and 2 tutorial periods per week for B.A. Part-I, B.A. Part-II and B.A. Part-III classes. The number of students for each tutorial batch for B.A. Part-I is to be not more than 10.**

Shri Rao has observed that instead of following this norms the Ad-hoc Committee has prescribed the norms of its own showing scant respect to the constitutional bodies of the University. The lecture periods for B.A. Part-II and B.A. Part-III have been reduced to 2 per week with batch of 25 students each for tutorial. Shri Rao has also observed that it is not known how the Ad-hoc Committee assumed authority on issues like size of tutorial batch, number of periods per class or total tutorial periods for B.Sc. Part-I or B.Com. Final classes.

**His complaint will have to be taken into account in determining the surplusage of teachers in the department of English whenever necessary."**

## राव यांच्या तक्रारीची रास्त दखल

**३५.** नबिरा महाविद्यालय, काटोलचा अहवाल समितीने २९ सप्टेंबर १९७६ रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व संमत केला. या अहवालामध्ये इंग्रजी विषयाचे विभागप्रमुख प्रा.डी.एस.राव यांच्या निवेदनाची अतिशय यथायोग्य दखल घेण्यात आलेली होती. प्रा.डी.एस.राव हे त्या महाविद्यालयातील त्या विषयाचे सर्वात ज्येष्ठ शिक्षक आहेत व त्यांनी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे व विद्यापीठाच्या मा.कुलगुरूंकडे याबाबतीत तक्रार नोंदविलेली आहे, ही गोष्ट या अहवालामध्ये पुढील शब्दात नमूद करण्यात आलेली होती. :- "Shri Rao who is the seniormost teacher in the Department in

the grade of Rs. 400-800 has sent a letter to the Director of Higher Education, Maharashtra on 20th August, 76 with a copy to the Vice-Chancellor." विद्यापीठाने प्रसृत केलेल्या सन १९७५-७६ च्या अभ्यासक्रम पुस्तिकेमध्ये याबाबत जे निकष ठरविण्यात आलेले आहेत त्यामध्ये ॲडहॉक कमेटीने विपरीत बदल केलेले आहेत याबाबतची त्यांनी नोंदविलेली तक्रार या अहवालात पुढील शब्दात नमूद आहे :- "He has made a complaint in his letter protesting against the change in the norms assumed by the Ad-hoc Committee which a college was asked to follow contrary to what is laid down by the University for the academic year 1975-76." बी.ए. भाग १, २ व ३ या वर्गांच्याकरीता सन १९७५-७६ च्या अभ्यासक्रम पुस्तिकेत दर आठवड्याला ४ तासिका व २ स्वाध्याय तासिका नमूद केलेल्या असून स्वाध्याय तासिकेच्या बॅचमध्ये १० विद्यार्थ्यांपेक्षा जास्त विद्यार्थी असू नयेत असेही या अभ्यासक्रम पुस्तिकेत नमूद केलेले आहे, असे प्रा.डी.एस.राव यांनी सादर केले होते; ते या अहवालात नमूद आहे ते पुढील शब्दात :- "According to Shri Rao, the University prospectus for 75-76 prescribed 4 lectures and 2 tutorial periods per week for B.A. Part-I, B.A. Part-II and B.A. Part-III classes. The number of students for each tutorial batch for B.A. Part-I is to be not more than 10."

## गरज पडल्यास तक्रार विचारात घेऊ

**३६.** कायद्याने स्थापीत केलेल्या विद्यापीठाच्या प्राधिकरणांनी तयार केलेल्या निकषांचे पालन करण्याऐवजी ॲडहॉक कमेटीने आपलेच स्वत:चे निकष तयार करून विद्यापीठाच्या प्राधिकरणांचा अवमान केलेला आहे. हे राव यांचे म्हणणे या अहवालात पुढील शब्दात नमूद करण्यात आलेले होते. :- "Shri Rao has observed that instead of following this norms the Ad-hoc Committee has prescribed the norms of its own showing scant respect to the constitutional bodies of the University." समितीने मान्य केलेल्या या अहवालाच्या शेवटी प्रा.राव यांची विनंती लक्षात घेऊन योग्य वेळी त्याबाबात आवश्यकता वाटल्यास विचार करावा लागेल असेही समितीच्या अहवालात नमूद होते.

## हेच 'ते' डी.एस.राव

**३७.** प्रा.डी.एस.राव यांनी इंग्रजी या विषयाच्या तासिकांची ॲडहॉक समितीने मोडतोड केली याबद्दल अत्यंत जागरूकपणे मा.उच्च शिक्षण संचालकांकडे, मा.कुलगुरूंकडे व समितीकडे जी तक्रार नोंदविली त्यांचा चांगलाच उपयोग झाला. नव्या निकषाप्रमाणे या विषयात किती शिक्षक अतिरिक्त होतात ते पाहून या निकषाचे आपण पूनर्विलोकन करू हा समितीचा अनौपचारिक निर्णय प्रा.राव यांच्या तक्रारीमुळे औपचारिकरित्या नोंदबद्ध झाला. तो पुढील शब्दात :- "His complaint will have to be taken into account in determining the surplusage of teachers in the department of English whenever necessary." याच प्रा.डी.एस.राव यांची एक आठवण या निमित्ताने नमूद करणे मला आवश्यक वाटते. सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या सहाव्या वेतन पूनर्विलोकन समितीने पुणे विद्यापीठ परिसरातील सेट भवनामध्ये दिनांक ५ जून २००८ रोजी सुनावणी ठेवली होती. संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांनी समितीसमोर उपस्थित राहून एक तपशीलवार निवेदन त्या समितीला संघटनेच्या वतीने सादर केले होते. हे निवेदन सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ८४ व ८५ वर प्रसृत करण्यात आले होते. संघटनेचे एक ज्येष्ठ नेते व नुटाचे सभासद क्रमांक एक (१) श्री.भय्यासाहेब ऊर्फ बी.एन.गर्गे यांनी एक ठराव आमसभेच्या विचारार्थ पाठविला होता. दिनांक ९ नोव्हेंबर २००८ रोजी कला वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळच्या सभागृहात झालेल्या आमसभेच्या बैठकीच्या कामकाज पत्रिकेमध्ये हा ठराव विषय क्रमांक ४८१ वर ठेवण्यात आला होता. तो पुढीलप्रमाणे:-

**"ITEM NO. 481 :** SUGGESTIONS TO THE PAY REVIEW COMMITTEE : Prof. B.N.Garge will move the following resolution:-

"Resolved to Appreciate sincere efforts of President Prof.B.T.Deshmukh for giving valuable suggestions to the Pay Review Committee of the University Grants Commission." *(P127NB2008)*

या विषयावर आमसभेत चर्चा सुरू असतांना कोणीतरी वेगळा काहीतरी विचार मांडला. त्यावेळेला मागच्या बेंचवर बसलेले एक वयोवृद्ध गृहस्थ पूर्णपणे त्या मांडणीचा प्रतिवाद करू लागले व ठराव कसा योग्य आहे हे जोरजोरात सांगू लागले. सभागृहातील सर्व सदस्य मागे वळून पाहू लागले. तेव्हा हे सदस्य कोण आहेत? हे कोणाच्याही लक्षात येईना. अध्यक्षस्थानी काम करीत असलेले प्रा.बी.टी.देशमुख यांच्या, ते काटोल येथून १०-१५ वर्षांपूर्वी निवृत्त झालेले इंग्रजी विभागप्रमुख प्रा.डी.एस.राव आहेत, हे लक्षात आले. प्रा.राव यांना अध्यक्षांनी व्यासपीठावर बोलाविले व सभागृहाला त्यांची ओळख करून दिली. प्रा.राव यांनी त्या सभेत असे सांगितले की, "आमसभेची पूर्वसूचना व कामकाज पत्रिका ही बरीच अगोदर येते. मी विजयवाड्याला राहत असलो तरी 'नुटा बुलेटीन' मला नियमितपणे मिळत असते. आमसभेची नोटीस आल्याबरोबर रेल्वेचे रिझर्व्हेशन केले. आपली संघटना व आपली आमसभा कशी काम करीत आहे हेही या निमित्ताने पहावे अशी भावना माझ्या मनामध्ये निर्माण झाली. हा जो ठराव आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी आपण आमसभेला हजर राहिले पाहिजे असे मला वाटले. आमची संघटना व आमचे पदाधिकारी यांचा आम्हाला अभिमान वाटतो." हा घटनाक्रम आमसभेच्या त्या दिवशीच्या कार्यवृत्तामध्ये सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १५८ वर नोंदबद्ध झालेला आहे. थोडक्यात नमूद असलेला हा वृत्तांत पुढीलप्रमाणे :-

"(C) १५-२० वर्षापूर्वी काटोलच्या नबिरा महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेले व सध्या विजयवाडा येथे वास्तव्यास असलेले संघटनेचे ज्येष्ठ सदस्य प्रा.डी.एस. राव यांनी याबावत आपले विचार मांडतांना असे सांगितले की, "या ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी मुद्दाम आज विजयवाड्याहून या आमसभेसाठी आलो आहे. मी सेवानिवृत्त होऊन अनेक वर्षे झालेली असली तरी आम्हाला आमच्या संघटनेचा व पदाधिकाऱ्यांचा अभिमान वाटतो." या वयात सुद्धा प्रा.श्री.डी.एस.राव हे विजयवाड्याहून मुद्दाम आमसभेला उपस्थित राहतात ही बाब निश्चितच अभिनंदनीय आहे **असे विचार अध्यक्षांनी व्यक्त केले.**" *(P158NB2008)*

## स्वाध्याय तासिकेच्या बॅचमधील संख्या कमी करण्यात आली

**३८.** सर्व महाविद्यालयातून दाखल करण्यात आलेल्या इंग्रजी विषयाच्या विवरणपत्रांचा विचार करता सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यातच समितीच्या असे लक्षात आले होते की, स्वाध्याय तासिकांकरीता २५ विद्यार्थ्यांची बॅच न करता विद्यार्थ्यांची संख्या कमी केल्यास अतिरिक्त शिक्षकांची संख्या आणखी कमी होऊ शकते आणि म्हणून समितीने तसा निर्णयसुद्धा घेतला. नागपूर विद्यापीठातर्फे सर्व महाविद्यालयांना तसे कळविण्यात आलेले होते. नागपूर विद्यापीठाच्या उप कुलसचिवांनी दिनांक ८ सप्टेंबर १९७६ रोजी सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पत्र (No.AC/CO/G/514) रवाना केले. या पत्रातील पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे होता :-

"Sir,

The Ad-hoc Committee **reconsidered** the norms laid down earlier for English and has made the following changes. You are requested to send the two proforma showing the load of work in the Department of English and absorption of teachers according to the work-load as prescribed below :-

| Class | Lectures | Tutorials | For a batch of 20 students per week. |
|---|---|---|---|
| Pre-Univ.Arts | 4 | 1 | -do- |
| B.A.Part-I | 4 | 1 | -do- |
| B.A.Part-II | 4 | 1 | -do- |
| B.A.Part-III | 4 | 1 | -do- |
| Pre-Uni.Commr. | 4 | 1 | -do- |
| B.Com-Part-I | 4 | 1 | -do- |
| B.Com-Part-III | 5 | - | .. |
| Pre.Uni.Sci. | 4 | 1 | For a batch |
| B.Sc.Part-I | 4 | 1 | of 20 students week |

Note :- (1) A batch will not exceed 20 by more than 10 p.c. of 20.

(2) Tutorials will be treated as equivalent to theory periods for calculations of the workload.

As regards the workload prescribed for supplmentary English and English Liturature there is no change, the same should be calculated as per the norms already sent to you."

*****

*- प्रा.बी.टी.देशमुख यांनी शब्दबद्ध केलेल्या व प्रकाशन प्रस्तावित असलेल्या आगामी नुटा बुलेटीनच्या "वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना विशेषांक" मधून (परिच्छेद ३१ ते ३८) उधृत*

*****

No. 28/30/2004-P&PW (B)

# Government of India : Ministry of Personnel, Public Grievances and Pension
## Department of Pension and Pensioners' Welfare

Lok Nayak Bhavan, Khan Market, New Delhi,

## DATED THE 11TH JUNE, 2020 : OFFICE MEMORANDUM

**Subject: -** Mobility of personnel amongst Central / State & Autonomous Bodies while working under Pensionable establishments – regarding.

The undersigned is directed to say that the New Pension Scheme (now called as National Pension System) was introduced vide Department of Economic Affairs' notification No.5/7/2003-ECB.PR dated 22.12.2003. It was provided that NPS would be mandatory for all new recruits to the Central Government service from 1st of January 2004 except the Armed Forces.

**2.** In this Department's O.M. of even number dated 26.7.2005, it was provided that all employees who joined Central Government service or in the service of an autonomous body set up by the Central Government before 1.1.2004 and who were governed by old pension scheme under the Central Civil Service (Pension) Rules, 1972 will continue to be governed by the same pension scheme / rules and will count their past service if they take up new appointment in another Ministry / Department of the Central Government or a Central Autonomous Body covered by the CCS (Pension) Rules on or after 1.1.2004, subject to their satisfying the conditions laid down in Para 4 of DP&AR's O.M. No.28/ 10/1984-PU dated 29.8.1984.

**3.** Subsequently, vide this Department's O.M. of even number dated 28.10.2009, the benefit of counting of past service under the CCS(Pension) Rules, 1972 was extended to those employees who were initially appointed before 1.1.2004 in (i) Central Government Departments covered under Railway Pension Rules or other similar non-contributing pensionable establishments of Central Government covered by old Pension Scheme /rules other than CCS(Pension) Rules, 1972 OR, (ii) State Government covered under old pension scheme similar to CCS(Pension) Rules, OR (iii) Central / State Autonomous Body covered by the old pension scheme and who resigned to join a Central Government Department / Office or a Central Autonomous Body having pensionable establishment.

**4.** Representations have been received in this Department from employees who joined under NPS in Central Government / Central Autonomous Bodies after 1.1.2004 but before 28.10.2009, after technical resignation from a pensionable establishment of a Central Government Department, State Government or Central / State Autonomous Body and who were denied the benefit of counting of past service in the old pension scheme in the Central Government.

**5.** The matter has been examined in consultation with Department of Personnel and Training and Department of Expenditure. It has been decided that those employees who joined Central Government / Central Autonomous body under NPS during 1.1.2004 to 28.10.2009 after submitting technical resignation from Central Govt. / Central Autonomous Body or a State Government / State Autonomous Body and who fulfill the conditions for counting of past service in terms of this Department's O.M. dated 28.10.2009, may be given an option for induction in old pension scheme and to get their past service rendered in the Central / State Government or Central / State Autonomous Body counted for the purpose of pensionary benefits on their final retirement from the Central Government / Central Autonomous Body, subject to fulfillment of all other conditions of counting of such past service in terms of DPAR's O.M. dated 29.8.1984 read with this Department's O.M. dated 7.2.1986 as amended from time to time.

**6.** Such option may be exercised within 3 months of issue of this O.M. Such employees who are appointed under NPS during 1.1.2004 to 28.10.2009 and are eligible to exercise option in terms of para 5 above but do not exercise the option within the stipulated period will continue to be covered by the provisions of National Pension System. Those employees who joined during 1.1.2004 to 28.10.2009 and have already been given the benefit of CCS(Pension) Rules in terms of O.M. dated 28.10.2009, will continue to be governed by those rules.

**7.** Those employees who exercise option for counting of past service in accordance with the above provisions may be allowed to avail the benefit under CCS (Pension) Rules, 1972. The capitalized value of pension and gratuity for the past service in the Central / State Autonomous Body will be deposited by that Body to the Central Government / Central Autonomous Body in accordance with the instructions contained in the O.M. No. 28/10/ 84-Pension Unit dated 29.8.1984. In case the employee concerned has received the pensionary benefits from the Central Government Departments, State Government, Central / State Autonomous Body, etc., he would be required to deposit the amount of such pensionary benefits (along with interest to be calculated in accordance with this Department's O.M. No.38/34/2001-P&PW(F) dated 29-07-2002) with the Central Government Department /Central Autonomous Body in which he has joined, to enable counting of past service. The employee's share in the accumulated wealth of National Pension System with interest / returns accrued thereon under the NPS, would be deposited in the GPF account of the employee. The employer's share along with interest / returns accrued thereon under the NPS would be deposited in the account of Central Government / Central Autonomous Body in accordance with modalities provided in para 9 of this OM.

**8.** In some cases, due to non-availability of benefit of counting of past services under the old pension system during 01.01.2004 to 28.10.2009, the employees of State Government/ State Autonomous bodies etc. may have been compelled to take voluntary retirement before joining pensionable Central Government Department/ Central Autonomous bodies after 01.01.2004 but before 28.10.2009. It has been decided that 'voluntary retirement' of such employees may be treated as 'technical resignation' and the benefit of provisions of para 5 to para 7 above may also be extended to them subject to fulfillment of all other conditions for counting of service.

**8.1** The forwarding the application through proper channel for the post they had joined after getting voluntary retirement is a pre- requisite for considering it as technical resignation.

**8.2** The provisions of this O.M. is mandatory in all such cases.

**9.** The modalities of accounting of the NPS accumulation would be as under:

| S. No. | Issues | Adjustment process |
|---|---|---|
| 1 | Adjustment of employee's contribution to NPS | Amount may be credited to the individual's GPF account and the account may be recasted permitting up to date interest. (FR 16 & Rule 11 of GPF Rules) |
| 2 | Adjustment of Government contribution to NPS | To be accounted for as (-) Debit to Object Head "70- Deduct Recoveries" under Major Head " 2071- Pensio and other Retirement Benefits" and Minor Head " 911 – Deduct Recoveries of overpayments" (GAR 35 and Para 3.10 of LMMH and Para 5.1.3 (iii) of Civil Accounts Manual refers) |
| 3 | Adjustment of increased value of subscription in NPS on account of appreciation of investment | May be accounted for by crediting the amount to Government Account under Major Head "0071- Contribution & Recoveries towards Pension & other Retirement Benefits" and Minor Head "800-Other-Receipts" (Note under above Major Head in LMMH) |

**10.** All Ministries / Departments are requested to bring the contents of these orders to the notice of Controller of Accounts/Pay and Accounts Officers and Attached, Subordinate Offices and Autonomous bodies under them.

**11.** This issues in consultation with of Ministry of Finance, Deptt. of Expenditure vide ID Note No. 25(6)/ EV/2017 Dated 06.01.2020 and in consultation with Controller General of Accounts vide their I.D. Note No. 1(7)(2)/2010/c/a/TA/860 dated 18.08.2017.

**12.** In their application to the employees of Indian Audit and Accounts Department, these orders are issued after consultation with Comptroller and Auditor General of India, as mandated under Article 148(5) of the Constitution.

**13.** Hindi version will follow.

**(Ruchir Mittal)**
**Deputy Secretary to the Government of India**

To : **(1)** All Central Government Ministries / Departments. **(2)** Chief Secretaries of all State Governments/UTs. **(3)** Accountant Generals in the States and UTs. **(4)** Department of Expenditure, Ministry of Finance, North Block, New Delhi. **(5)** C&AG, Bahadur Shah Zafar Marg, New Delhi. **(6)** Ministry of Railways, Railway Board, New Delhi. **(7)** Department of Financial Services, Jeevan Deep Building, Parliament Street, New Delhi. **(8)** CGA, Department of Expenditure, INA, New Delhi. **(9)** AD(OL) for Hindi version. **(10)** NIC for posting on the website of this Department.

---

*राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यामधील अंतिम सत्र/अंतिम वर्षाच्या पदवी व पदव्युत्तर परीक्षांचे नियोजन करण्याबाबत.*

## महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग

*शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२०/प्र.क्र.१२३/विशि-३, : मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ :* ***दिनांक :- १९ जून, २०२०***

संदर्भ :- (१) अवर सचिव (आपत्ती व्यवस्थापन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.आव्यप्र-२०१९/प्र.क्र.१/आव्यप्र-१, दि. १९ जून, २०२०.

### प्रस्तावना

कोव्हीड-१९ या जागतिक महामारीच्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या गंभीर परिस्थितीवर केंद्र आणि राज्य शासनाने विविध आपत्कालीन उपाययोजना राबविल्या असून शासनाने राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी साथीरोग प्रतिबंधक कायदा, १८९७, दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू केला आहे. सदर अधिनियमातील कलम २ अन्वये तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदींअन्वये राज्यात टाळेबंदी लागू केली असून कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर लोकांच्या एकत्र येण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

२. कोव्हिड-१९ या विषाणूमुळे राज्या सद्यस्थितीत रुग्णांच्या संख्येत दररोज मोठ्या प्रमाणावर वाढ होत असून या साथीचा प्रादुर्भाव राज्यात वाढत आहे. सद्यःस्थितीत ४१ महाविद्यालयीन इमारती व १९८ वसतीगृहे विलगीकरणासाठी अधिग्रहीत करण्यात आली आहेत. तसेच, साथरोगाच्या जोखमीमुळे बहुतांश विद्यार्थी हे शैक्षणिक संस्था/वसतीगृहे सोडून त्यांच्या स्वग्रामी गेलेले आहेत.

३. सद्यस्थितीत राज्यातील १४ सार्वजनिक विद्यापीठांमध्ये अंतिम वर्षाला प्रवेशित असलेले अव्यावसायिक (Non-Professional) अभ्यासक्रमाचे ७,३४,५१६ विद्यार्थी व व्यावसायिक (Professional) अभ्यासक्रमाचे २,८३,९३७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कोव्हिड-१९ मुळे उद्‌भवलेल्या आरोग्यविषयक जोखीमीमुळे या विद्यार्थ्यांची अंतिम सत्राची/अंतिम वर्षाची परीक्षा जुलै महिन्यात घेणे सद्यस्थितीत शक्य नाही. तसेच या साथ रोगाचे नियंत्रण केव्हापर्यंत शक्य होईल, याबाबत निश्चित कालमर्यादा स्पष्ट नाही. तसेच नवीन शैक्षणिक सत्र सुरू करणे ही आवश्यक आहे. नवीन शैक्षणिक वर्ष उशिराने का होईना पण सुरु होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य, त्यांची कारकीर्द अशी अमर्याद कालावधीसाठी रोखून धरणे उचित राहणार नाही.

४. राज्यातील वास्तविक विचारात घेता, विद्यार्थ्यांचे मोठ्या संख्येने परीक्षेकरिता राज्यातील विविध ठिकाणाहून येणे-जाणे, एकत्र जमा होणे या बाबींचा विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा घेण्यासंदर्भात बैठकव्यवस्था व इतर व्यवस्था करणे यांची व्यवहार्यता तपासणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच सद्यस्थितीत राज्यातील अनेक महाविद्यालयीन इमारतींचा व वसतीगृहांचा वापर विलगीकरण केंद्र म्हणून करण्यात येत आहे. राज्यात सद्यस्थितीत कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने अशा परिस्थितीत विद्यापीठांच्या अंतिम सत्राच्या/ अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे व्यावहारीकदृष्ट्या शक्य होत नसल्याने सदर परीक्षांच्या आयोजनाबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

५. प्रचलित कार्यपद्धतीनुसार परीक्षा पद्धतीमध्ये अनेक प्रक्रियांचा समावेश असून त्यामध्ये प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षेसाठी बैठकव्यवस्था करणे, उत्तरपत्रिका तपासणे, गुणपत्रिका तयार करणे, निकाल घोषित करणे, फेरमूल्यांकन करणे, परीक्षेसाठी पोलीस बंदोबस्त ठेवणे अशी अनेक कामे समाविष्ट आहेत. याकरिता मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय यंत्रणेची व मनुष्यबळाची आवश्यकता असून या प्रक्रियेतील समाविष्ट घटकांपैकी एकाही व्यक्तीस कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव झाल्यास त्याची लागण मोठ्या संख्येने इतर घटकांमध्ये होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पोलीस व विद्यापीठ/शैक्षणिक संस्थेच्या प्रशासनातील इतर सहभागी घटक यांच्या आरोग्यास गंभीर धोका उत्पन्न होऊ शकतो.

६. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ साठीचे वेळापत्रक, सत्र परीक्षांची फेररचना व निकाल जाहिर करणे या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे नियोजन करण्यासाठी नेमण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीने आपला अहवाल शासनास दि. ६ मे, २०२० रोजी सादर केला असून शासनाने सदर अहवाल दि. ८ मे, २०२० रोजी स्वीकृत केलेला आहे. या समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक कार्यक्रमासंदर्भात नियोजन करण्यात आलेले आहे. तथापि, प्राप्त परिस्थितीत या शिफारशींनुसार अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या परीक्षांचे आयोजन करण्याबाबत प्रभावी उपाययोजना करून निर्णय घेणे आवश्यक ठरले आहे.

७. राज्यातील कोव्हिड-१९ या साथरोगाची परिस्थिती विचारात घेता, सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता पारंपारीक (अव्यावसायिक) अभ्यासक्रमांच्या पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्यासंदर्भात, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम १८ व या अधिनियमातील संबंधित इतर तरतुदींनुसार, या अधिनियमाअन्वये घटीत राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दिनांक १८ जून, २०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये या संदर्भातील प्रस्ताव विचारार्थ ठेवण्यात आला होता. या बैठकीचे इतिवृत्त उपरोक्त संदर्भ क्र. (१) अन्वये महसूल व वन (आपत्ती व्यवस्थापन) विभागाकडून दि. १९ जून, २०२० रोजी प्राप्त झाले आहे. या बैठकीतील निर्णयानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

### शासन निर्णय

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्या संलग्नित महाविद्यालये यामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या आयोजनाकरिता विद्यापीठांनी खालील (अ) मधील मुद्दा क्र. (१) व (२) प्रमाणे कार्यवाही करावी :-

(अ) अव्यावसायिक (पारंपारीक) अभ्यासक्रम :-

(१) मागील सर्व सत्रात उत्तीर्ण झालेल्या ज्या अंतिम सत्रातील/वर्षातील विद्यार्थ्यांना परीक्षा न देता पदवी प्रमाणपत्र हवे असल्यास तसे त्यांच्याकडून लेखी स्वरुपात घेऊन विद्यापीठांनी योग्य ते सूत्र वापरून त्यांचा निकाल घोषित करावा.

(२) मागील सर्व सत्रात उत्तीर्ण झालेल्या अंतिम सत्रातील/वर्षातील ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची इच्छा असेल तसे त्यांच्याकडून लेखी स्वरुपात घेऊन त्यांना परीक्षेस बसण्याची संधी देण्यात यावी. अश विद्यार्थ्यांच्या परीक्षा कोणत्या महिन्यात घेता येऊ शकतील, याची कोव्हिड-१९ च्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन, तसेच संबंधित जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती निवारण प्राधिकरण यांचेशी विचारविनिमय करून विद्यापीठांनी निर्णय घ्यावा व त्यानुसार वेळापत्रक जाहिर करावे.

(३) ज्या अंतिम वर्षांच्या विद्यार्थ्यांचा बॅकलॉग आहे, त्यांच्या बॅकलॉगच्या विषयांच्या परीक्षेसंदर्भात विद्यापीठांचे कुलगुरू व संबंधित अधिकारी यांची शासनस्तरावर बैठक घेऊन विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येईल.

(ब) व्यावसायिक अभ्यासक्रम (अभियांत्रिकी, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट, व्यवस्थापनशास्त्र, वास्तुकला, प्लॅनिंग, संगणकशास्त्र, विधी, शारीरीक शिक्षण, अध्यापन शास्त्र)

राज्यातील कोव्हिड-१९ ची परिस्थिती विचारात घेता, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या परीक्षा घेता येणार नाहीत. त्या विद्यार्थ्यांकरिता अव्यावसायिक अभ्यासक्रमाप्रमाणेच उपरोक्त (अ) मधील अ.क्र. (१), (२) व (३) प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, असा निर्णय राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यास मान्यता देण्याची विनंती संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संबंधित शिखर संस्थेस करण्यात येईल. त्याबाबत स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

२. प्रस्तुत शासन निर्णय, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये घटीत राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दिनांक १८ जून, २०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. यासंदर्भात सर्व संबंधित विद्यापीठांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००६१९१३१४३३९४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सतिश तिडके)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**Continued from Page 68 of 2020 NUTA Bulletin.**

**TABLE-6**

Principals of UG College

**Scale of pay/ Pay in the Pay Band & Grade pay at the time of Retirement**

| | |
|---|---|
| From 01.01.1986 to 31.12.1995 | 3700-125-4950-150-5700 |
| From 01.01.1996 to 31.12 2005 | 12000-420-18300 (Minimum to be fixed at Rs. 12840/-) |
| From 01.01.2006 to 31.12.2015 | 37400-67000 AGP 10000 |
| Corresponding level w.e.f. 01.01.2016 | Academic Level-14 (144200-218200) |

| Basic Pay From 01.01.1986 to 31.12.1995 | Basic Pay From 01.01.1996 to 31.12.2005 | Basic Pay From 01.01.2006 to 31.12.2015 | Pay range for Pensioners retired during 01.01.2006 to 31.12.2015 | | Notional Pay as on 01.01.2016 | Revised Pension/ Enhanced Family Pension (if applicable) w.e.f 01.01.2016 | Revised Family Pension w.e.f. 1.1.2016 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Minimum | Maximum | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | 6 | 7 |
| 3700 | 12840 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 3825 | 12840 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 3950 | 12840 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 4075 | 13260 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 4200 | 13260 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 4325 | 13260 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 4450 | 13680 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 4575 | 13680 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 4700 | 13680 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 4825 | 14100 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 4950 | 14100 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 5100 | 14100 | 47400 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 5250 | **14520*** | **47400*** | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 5400 | **14520*** | **47400*** | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 5550 | 14940 | 48530 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 5700 | 15360 | 48530 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 5850 | 15780 | 49690 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| 6000 | **16200*** | **49690*** | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| | **16200*** | **49690*** | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| | 17040 | 50890 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| | 17460 | 52120 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| | 17880 | 52120 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| | 18300 | 53390 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| | 18720 | 53390 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| | 19140 | 54700 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| | 19560 | 54700 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| | | 56050 | | 56100 | 144200 | 72100 | 43260 |
| | | | 56110 | 57780 | 148500 | 74250 | 44550 |
| | | | 57790 | 59530 | 153000 | 76500 | 45900 |
| | | | 59540 | 61320 | 157600 | 78800 | 47280 |
| | | | 61330 | 63150 | 162300 | 81150 | 48690 |
| | | | 63160 | 65050 | 167200 | 83600 | 50160 |
| | | | 65060 | 67000 | 172200 | 86100 | 51660 |
| | | | 67010 | 69020 | 177400 | 88700 | 53220 |
| | | | 69030 | 70850 | 182100 | 91050 | 54630 |
| | | | 70860 | 73220 | 188200 | 94100 | 56460 |
| | | | 73230 | 75400 | 193800 | 96900 | 58140 |
| | | | 75410 | 77000 | 199600 | 99800 | 59880 |

# Pay calculated on the basis of MHRD letter No. 1-36/2009-U.II dated 26.08.2010, Column No.1 & 2 taken from Table No.7 of MHRD letter No. 1-22/99-U.1 dated 15.12.1999, Column No. 3 taken from Table No. 3 of Govt. of India Gazette Notification dated 18.09.2010, Column No. 5 taken from Annexure-I of UGC letter No.23-4/2017 (PS) dated 30.01.2018, Column No. 6 is the 50% of Column No. of 5, Column No. 7 is the 30% of Column No. of 5, * Modified in accordance with UGC's letter dated 09.08.2019.

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 05.07.2020) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.07.2020**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................